# जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Address - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in


**प्रेसनोट क्र. ५५१ दि.१७/०३/२०२०**

## दत्तवाडी पोलीस स्टेशन,पुणे शहर
## खुनाचे प्रयत्नातील तीन फरार गुन्हेगारांना दत्तवाडी पोलीसांनी केले जेरबंद

पैशाचे व दागदागिन्यांचे देवाण घेवाणीवरुन नातेवाईकांमधील आपसातील वाद विकोपाला जावुन दि. १३/०३/२०२० रोजी सई हेरिटेज, सिंहगड रोड, पुणे येथे राहणारे सागर दत्तात्रय सांगळे यांचेवर त्यांचाच नातेवाईक मामेभाऊ नामे ओकांर ऊर्फ सोन्या संतोष ननावरे, रा. पारवडी, ता. भोर, जि. पुणे याने त्याचे तीन चार साथीदारांसह हत्यारानिशी अचानकपणे रात्रीच्या वेळी हल्ला करुन, त्यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्यांचे डोक्यात पाठीत मानेवर त्यांचेकडील धारदार कोयत्याने वार करुन त्यांना गंभीर जखमी केले होते. तसेच त्यांच्या पत्नी माधुरी सांगळे या सोडविण्यासाठी गेल्या असता त्यांचे हातावर कोयत्याने वार करुन त्यांनाही जखमी करुन गुन्हेगार तेथुन पळुन गेले होते. त्यावरुन दत्तवाडी पोलीस ठाणे येथे फिर्यादी माधुरी सांगळे यांनी फिर्याद दिल्याने दत्तवाडी पोलीस ठाणे येथे सदरबाबत भा.द.वि. कलम ३०७, ३४, आर्म ॲक्ट कलम ४(२५), म.पो.का. कलम ३७(१)/१३५ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

त्यानंतर दि. १६/०३/२०२० रोजी दाखल गुन्हयाचा तपास करीत असताना तपास पथकाचे पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ व पोलीस उपनिरिक्षक मनोज अभंग हे तपास पथकाचे कार्यालयात स्टाफ सोबत गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे ओकांर ऊर्फ सोन्या संतोष ननावरे याचेबाबत माहीती काढत असताना पो. शि. ९१०२ वाबळे यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, “दि. १३/०३/२०२० रोजी सई हेरिटेज, सिंहगड रोड, पुणे येथे राहणारे सागर दत्तात्रय सांगळे यांचेवर कोयत्याने वार करुन त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणारा त्यांचा मामेभाऊ नामे ओकांर ऊर्फ सोन्या संतोष ननावरे हा त्याचे दोन साथीदारांसह कात्रज येथील पी एम टी बसस्टॉपचे समोर कोणाची तरी वाट पाहत थांबलेला आहे. त्याने त्याचे अंगात काळी फॉर्मल पॅन्ट व पांढरे रंगाचा नक्षी असलेला हाफ बाहयाचा शर्ट घातलेला असुन त्याचे केस बारीक आहेत.” त्यावेळी त्यांनी सदर बातमी पोउनि कुलदिप संकपाळ व मनोज अभंग यांना कळविली असता त्यांनी सदरची बातमी ही वपोनि देविदास घेवारे यांना कळविली. त्यावेळी त्यांनी कारवाई बाबत मार्गदर्शन करुन नमुद आरोपीतांना तत्काळ ताब्यात घेणेबाबत आदेशीत केल्याने त्याप्रमाणे पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ व वरील स्टाफ यांनी तत्काळ साध्या वेशात खाजगी वाहनाने कात्रज चौक, पी एम टी बसस्टॉप समोर येथे जावुन दोन टिम तयार करुन सापळा लावुन योजनेप्रमाणे थोडे आडबाजुला थांबुन खात्री केली असता बातमीतील वर्णनाचा तसेच पोलीसांकडील प्राप्त फोटोतील वर्णणाचा इसम हा आणखी दोन इसमांना घेवुन तेथे दत्तनगर कडे जाणारे रोडचे कडेला कोणाची तरी वाट बघत थांबलेला असलेला पोलीसांना दिसुन आला. त्यावेळी पोलीसांनी ठरल्याप्रमाणे दोन्ही टीम मिळुन चहुबाजुने सापळा रचुन सदर इसमांना अचानकपणे छापा घालुन जागीच १९/३० वाजता पकडुन त्यांना आहे त्या स्थितीत ठेवुन त्यांना त्यांची नावे पत्ता विचारता त्यांनी आपली नावे १) ओकांर ऊर्फ सोन्या संतोष ननावरे, वय. २१ वर्षे, धंदा. सलुन व्यवसाय, रा. मराठी शाळेजवळ, काळुबाई मंदीर, पारवडी, ता. भोर, जि. पुणे २) ऋषीकेश संतोष ननावरे, वय. १९ वर्षे, धंदा. काहीनाही, रा. मराठी शाळेजवळ, काळुबाई मंदीर, पारवडी, ता. भोर, जि. पुणे ३) सागर नानासाहेब लिमण, वय. १९ वर्षे, धंदा. शिक्षण, रा. गावातील विहीरीजवळ, पारवडी, ता. भोर, जि. पुणे अशी असल्याची सांगीतली त्यावेळी पोलीसांनी त्यांना त्यांचेवर दाखल असलेले गुन्हयात त्यांचे सहभागाबाबत विचारले असता त्यांनी दाखल गुन्हा केल्याचे कबुल केले असुन यातील जखमी सागर सांगळे यांचा खुन करण्याचा त्यांनी सर्वांनी प्रयत्न केला असल्याचे सांगीतले. म्हणुन त्यांना दाखल गुन्हयात पोलीसांनी ताब्यात घेवुन अटक केले असुन त्यांना अटक मुदतीत मा. न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने त्यांची पोलीस कस्टडीची रिमांड मंजुर केली आहे.

सदरची कारवाई ही दत्तवाडी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक देविदास घेवारे व पोलीस निरिक्षक (गुन्हे) राजेंद्र सहाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रभारी पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ, पोलीस उपनिरिक्षक मनोज अभंग व पो. हवा. तानाजी निकम, रविंद्र फुलपगारे, राजु जाधव पो. ना. सुधीर घोटकुले, महेश गाढवे, सोमेश्वर यादव, पो. कॉ. अक्षयकुमार वाबळे, शिवाजी क्षीरसागर, सागर सुतकर, विकास कदम, नवनाथ भोसले, शरद राऊत, राहुल ओलेकर यांनी केली आहे. तसेच दाखल गुन्हयाचा पुढील तपास हा पोलीस उपनिरिक्षक मनोज अभंग हे स्वतः करीत आहेत.